ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 9 | MAY - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# शेतीचे बदलते स्वरूप आणि शेतकरी चळवळी

प्रा. जगदिश द. हेंडवे
इतिहास विभाग प्रमुख, बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पारवा ता.घाटंजी जि.यवतमाळ.

**सारांश :-**



प्राचीन काळापासून भारत कृषीप्रधान देश आहे. शेती हा बहुसंख्य लोकांचा आजही व्यवसाय आहे. तेच लोकांच्या उपजिविकेचे मुलभूत साधन आहे. प्राचीन काळापासून ब्रिटीश काळापर्यंत स्वयंपूर्ण ग्रामजीवन हे भारताच्या कृषी अर्थव्यवस्थेचे महत्वाचे वैशिष्ट्यो होते. राज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन जमीन महसूल होते. गावातील लोकांच्या गरजा शेतीशी निगडीत होत्या. शेती हाच ग्रामीन जीवनाचा मूलाधार होता. ग्रामीण जीवन समृध्द व सुखी होते. भारतात संयुक्त कुटूंब पध्दती अस्तित्वात होती. या सर्व कुटूंबाचा उदरनिर्वाह शेती व शेती संबंधीत उद्योगांवर अवलंबून होते. एकंदरीत प्राचीन काळापासून ब्रिटीश काळापर्यंत ग्रामीण जनजीवन समृध्द होते.

या काळातील राज्यकर्त्यांनी शेती विकासाकडे विशेष लक्ष दिले होते. शेती सिंचनासाठी नदीवर कालवे, धरणे बांधलेत. तसेच विहीरींची, पाटबंधाऱ्यांची उत्तम व्यवस्था करून अधिकाधिक जमीन ओलीताखाली आणली. परिणामी शेती उत्पादनात वाढ होवून शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती मजबूत झाली. पर्यायाने सरकारी तिजोरीत भर पडली. शिवाय दुष्काळी परिस्थितीत प्रस्थापित सरकारकडून शेतकऱ्यांना व मजुरांना सर्व प्रकारची मदत दिली जात होती. शिवाय शेतकऱ्यांना शेतसाऱ्यात सुध्दा सुट दिली जात होती.

भारतात ब्रिटीशांच्या आगमनानंतर शेतकऱ्यांची स्थिती नाजूक झाली. इंग्रज कंपनी सरकारने जमीन महसूलाच्या विविध योजना अंमलात आणून जास्तीत जास्त जमिन महसूल वसूल केला. यात शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले. शिवाय त्यांनी शेतीचे व्यापारीकरण केले. त्यामुळे भारतीय शेतकऱ्यांना अनेक हालअपेष्टा सहन कराव्या लागल्यात. त्यांच्यावर व्यापारी पिके घेण्याची सक्ती करण्यात आली. परिणामी भारतीय शेतकऱ्यांना अन्नधान्याबाबत परकीयांवर अवलंबून राहावे लागले.

भारतात विविध काळात प्रचंड दुष्काळ पडले. या दुष्काळात लाखो लोकांचा अन्न न मिळाल्यामुळे मृत्यू झाला. त्यामुळे लाखो शेतकरी व शेतमजूर विस्थापित झाले. दुष्काळी स्थितीत शेतकऱ्यांना मदत देण्याऐवजी तत्कालीन सरकारने त्यांच्यावर अन्वनित अत्याचार केले. यातून शेतकऱ्यांमध्ये सरकार, जमीनदार व सावकार वर्गाविषयी प्रचंड असंतोष निर्माण झाला. शेतकऱ्यांनी विविध काळात, विविध प्रदेशात उठाव, आंदोलने केले. या आंदोलनात शेतकऱ्यांना काही प्रमाणात यशही मिळाले. मात्र हे उठाव सरकारने अत्यंत क्रूरपणे दडपून टाकले. असे असले तरीही सरकारला विविध अधिनियम पारित करावे लागले. अशारीतीने संघटीत शेतकरी आंदोलनाला यश मिळाले होते.

आधुनिक भारतात प्रथम उच्चभ्रू बुध्दिजीवी वर्गामध्ये जागृती झाली. कष्टकऱ्यांच्या कनिष्ठ वर्गापर्यंत ही जागृती झिरपायला काही काळ लागला. पण जेव्हा भारतीय शेतकऱ्यात पर्यायाने कष्टकरी

वर्गात जागृती झाल्यावर राष्ट्रीय चळवळीला नवे रूप मिळाले होते. अभिजन वर्गापूरती मर्यादित असलेली राष्ट्रीय चळवळ बहुजन समाजापर्यंत पोहोचली व चळवळीला प्रोत्साहन मिळाले. तेव्हा मात्र प्रस्थापित व्यवस्थेला सुध्दा शेतकऱ्यांच्या समस्यांची दखल घ्यावी लागली. 'समाजवाद' हे शेतकऱ्यांच्या व कष्टकऱ्यांच्या हक्कांचा पुरस्कार करणारे तत्वज्ञान होते.

इंग्रज काळापूर्वीची महसूल पध्दती बदलली. रोख व वक्तशीर महसूल भरणा आवश्यक बनला. खेड्यांची स्वयंपूर्णता संपुष्टात आली. पारंपारिक उद्योगांचा ऱ्हास झाला. शेतीवरील भार प्रचंड वाढला. शेतीचे व्यापारीकरण झाले. या व्यापारीकरणाची कुऱ्हाड आदिवासींच्या जंगल, जमिनीवरसुध्दा कोसळली. जमीनदार, वसूली अधिकारी, सावकार, दलाल यांनी हरप्रकारे शेतकऱ्यांचे शोषण केले. या संपूर्ण परिस्थिती विरूध्द शेतकऱ्यांमध्ये असंतोष धुमसू लागला.

प्राचीन काळापासून भारत शेतीप्रधान देश होता. शेती हेच लोकांच्या उपजीविकेचे मुलभूत साधन होते. स्वयंपूर्ण ग्रामजीवन हे भारताच्या कृषी अर्थव्यवस्थेचे महत्वाचे वैशिष्ट्यो होते. राज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन शेतीतून मिळणारे उत्पन्न होते. म्हणजेच जमीन महसूल होय. तत्कालीन काळापासून तर मध्यकाळापर्यंत म्हणजे इंग्रजाच्या काळापर्यंत भारतीय शेती संपन्न होती. भारतीय खेडी व खेड्यातील जीवन संपूर्णपणे शेतीवर अवलंबून होते. खेड्यातील लोकांच्या संपूर्ण गरजा या शेतीशी निगडीत होत्या. शेती हाच ग्रामीण जीवनाचा मूलाधार होता. ग्रामीण जीवन समृध्द व सुखी होते. भारतात संयुक्त कुटूंब पध्दती अस्तित्वात होती. या सर्व कुटूंबाचा उदरनिर्वाह केवळ शेती व शेती संबंधीत उद्योगांवर अवलंबून होता. एकंदरीत प्राचीन काळात ग्रामीण जनजीवन समृध्द होते.

प्राचीन काळात शेतीसंबंधीत सर्व सुविधा पुरविण्याचे काम तत्कालीन राज्यकर्त्यांनीही केले होते. सरकारकडून शेतकऱ्यांना सर्व आवश्यक त्या सुविधा पुरविल्या जात होत्या. यात शेती सिंचनाची व्यवस्था, म्हणजेच नद्यांवर कालवे, धरणे, विहीरी बांधून नदीतून सिंचन व्यवस्था केली जात असे. त्यांना राज्याकडून बी-बियाणे, शेती संबंधीत अवजारे, खतांचा पुरवठा केल्या जात असत. तसेच शेतकऱ्यांना सरकारकडून कर्ज दिले जात होते. हे शेतकरी शेतीतून परंपरागत पिके घेत असे. त्यामुळे शेतीतून भरघोष उत्पन्न मिळत. त्यामुळे त्या काळातील शेतकरी सुखी व संपन्न जीवन जगत होता. परिणामी राज्याची आर्थिक स्थिती मजबुत होती.

मध्ययुगीन काळातही भारतीय शेतीची स्थिती प्राचीन काळाप्रमाणेच होती. भारतात मुस्लिम राजवटीतसुध्दा राज्यकर्त्यांनी शेतीकडे पूर्ण लक्ष दिले होते. शेती सुधारणेचे त्यांनी प्रयत्न केले. याही काळात शेती हाच भारतीय ग्रामीण जीवनाचा मुलाधार होता. मध्ययुगीन काळात म्हणजेच मुस्लिम राजवटीतसुध्दा ग्रामीण समाज जीवन कृषी केंद्रीत होते. या काळात ग्रामीण जीवन स्वयंपूर्ण होते. ग्रामीण समाजातील लोकांचा शहरांशी अथवा राजकारणाची कोणताही संबंध येत नव्हता. कर देण्यापलीकडे त्यांचा सरकारशी संबंध येत नव्हता. तसेच राजकीय उलाढालीशी ग्रामीण लोकांचा कोणताही संबंध नव्हता. तशी त्यांनी त्याची दखलसुध्दा घेतली नाही. सरकारने नियुक्त केलेल्या सरकारी अधिकाऱ्यांशी गावातील प्रमुखांचा जमीन महसूला व्यतिरिक्त कोणताही संबंध व संपर्क नव्हता. त्यामुळे तत्कालीन ग्रामीण जीवन उच्च कोटीचे होते. गावातील लोकांच्या गरजा व त्यांच्या अपेक्षा मर्यादित होत्या. त्यामुळे लोक सुखी व संपन्न जीवन जगत होते.

भारतात एकीकडे राजा हा जमिनीचा मालक होता. तर दुसरीकडे प्रत्यक्ष जमीन कसणारा शेतकरी जमिनीचा मालक नव्हता. राजाने नेमलेले सरजांमदार, वतनदार हेसुध्दा जमिनीचे मालक नव्हते. त्यांच्याकडे जो प्रदेश सोपविल्या जात त्या प्रदेशातील महसूल वसूलीचे अधिकारच त्यांना मिळत असत. मात्र त्यांना जमिनींची मालकी मिळत नव्हती. शेतजमीन गावाच्या मालकीचे असे, ही जमीन शेतकऱ्यांना कसायला मिळत असे. गाव हा महसूल आकारणीचा घटक होता. शेतकऱ्यांना स्वतंत्रपणे सरकारला महसूल द्यावा लागत नव्हता. महसूल आकारतांना त्या वर्षाचे एकूण उत्पादन विचारत घेतले जात. महसूल प्रामुख्याने धान्याच्या रूपात घेतल्या जात असत. एकंदरीत स्वयंपूर्ण गावाच्या बंदिस्त कोशात गावकरी सहकार्याने नांदत असे. भारतात अनेक काळापासूनची ही व्यवस्था ब्रिटीश काळापर्यंत कायम होती. एकंदरीत प्राचीन काळापासून भारतीय शेती व शेतकरी सुस्थितीत होते. त्यांच्या मर्यादित गरजा भागविल्या

जात होत्या. शेतकरी वर्ग आनंदाने राहत होते. त्यांना कोणत्याही प्रकारचा राजसत्तेशी संघर्ष करावा लागत नव्हता. उलट त्यांना नैसर्गिक दुष्काळी परिस्थितीत सरकारकडून सर्व सवलती पुरविल्या जात होत्या. भारताच्या काही भागात शेतकरीच जमिनींचे मालक होते. त्यांना कोणत्याच प्रकारच्या समस्या नव्हत्या. पण ब्रिटीशांच्या आगमनानंतर भारतीय शेतीचे स्वरूपच बदलले. त्याचा शेती व शेतकऱ्यांवर विपरीत परिणाम झाला. यातून भारतीय शेतकऱ्यांना शासनाच्या विरोधात ठिकठिकाणी उठाव करावे लागले. यातूनच शेतकऱ्यांनी संघटीत होवून आंदोलने केलीत.

- **शेतकरी चळवळीत कारणीभूत असलेले घटक :-**

- **ब्रिटीशांची जमीन महसूल व्यवस्था :-**

ब्रिटीशांनी भारतात नविन जमीन-महसूल व्यवस्था अंमलात आणली. कंपनी सरकारच्या काळापासून जमीन-महसूल हे भारताच्या आर्थिक शोषणाचे एक महत्वाचे साधन बनले होते. रॉबर्ट क्लाईव्ह पासून हेस्टिंग्ज पर्यंतच्या ब्रिटीश गव्हर्नरांनी बंगाल प्रांताकडून प्रचंड जमीन महसूल वसूल केला. त्यांनी दुष्काळी काळातही अमानुषपणे कराची वसुली केली. यातून भारतीय शेतकऱ्यात ब्रिटीश सरकारविरूध्द तीव्र असंतोषाची भावना निर्माण झाली. त्यांच्यातील असंतोष दिवसेंदिवस वाढतच होता.

इ.स. १७९३ साली लॉर्ड कॉर्नवालीस याने कायमधारा पध्दती लागू केली. त्यांनी महसूल गोळा करण्यासाठी जमीनदाराचा वर्ग निर्माण केला. हे जमीनदार म्हणजे सरकार व शेतकरी यांच्यातील मध्यस्थ होते. जमीनदार हेच एकप्रकारे जमिनीचे मालक बनले होते तर जमीन कसणारे शेतकरी आता कुळे बनली होती. जमीनदार महसूल वसूल करतांना शेतकऱ्यांवर अत्याचार करीत. ही जमीन महसूल पध्दती बंगाल-बिहार-ओरिसा या प्रांतात सुरू होती. या पध्दतीत शेतकऱ्यांवर फार अन्याय करण्यात आला. त्यांना आपले जीवन जगणे असह्या झाले होते.

१८२० मध्ये सर थॉमस मन्रो यांनी मुंबई इलाख्यात रयतवारी जमीन महसूल पध्दती अंमलात आणली. मन्रोची ही पध्दत पारंपारिक भारतीय पध्दतीपेक्षा भिन्न होती. याशिवाय कंपनी सरकारने महसूल वाढविण्याकरिता महालवारी जमीन महसूल पध्दती सुरू केली होती. मात्र या तिन्ही पध्दतीत भारतीय शेतकरी होरपळून निघाला.त्यांची आर्थिक स्थिती अत्यंत खालावली. महसूल पध्दतीचे दुष्परिणाम भारतीय शेतकऱ्यांना भोगावे लागले. हा महसूल शेतकऱ्यांना धान्याच्या ऐवजी रोख रक्कमेत भरावा लागत असे. यासाठी त्यांना सावकाराकडून कर्ज काढावे लागत होते. यात त्यांना सावकारांनी फसवून त्यांच्या जमिनी हडप केल्या. अनेक शेतकरी भूमिहीन मजूर बनले. नवीन व्यवस्थेत सरकार, जमीनदारी व सावकारी असा तिहेरी पाश शेतकऱ्यांच्या गळ्याभोवती आवळल्या गेला. यातूनच शेतकऱ्यांत प्रस्थापित सरकार, भारतीय जमीनदार वर्ग आणि सावकार वर्गाविषयी तिव्र असंतोष निर्माण झाला. पुढे याच असंतोषाने उग्र स्वरूप धारण केले. यातून भारतीय शेतकऱ्यांची विविध प्रदेशात विविध ठिकाणी आंदोलने झाली. हा असंतोष १८५७ नंतर प्रकर्षाने दिसून येतो.

असे असले तरी त्याकाळात शेतकऱ्यांत जागृतीचे लोन नसल्यामुळे, तसेच त्यांचे सुव्यवस्थित संघटन नसल्यामुळे, शेतकऱ्यांच्या विद्रोहाचे राजनैतिक रूप धारण केलेले दिसून येत नाही. पण २० व्या शतकाच्या अगदी प्रारंभी शेतकरी वर्गात जागृती निर्माण होवून 'किसान सभेची' स्थापना झाली असे दिसून येते.

- **शेतीचे व्यापारीकरण :-**

ब्रिटीशांनी भारतीय शेतीचे व्यापारीकरण केले. व्यापाराचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून शेती करणे, घरच्या वा गावाच्या वापरापूरते नव्हे, तर बाजारपेठेत विकून नफा मिळविण्यासाठी शेतमालाचे उत्पादन करणे म्हणजे शेतीचे व्यापारीकरण होय. अशा रीतीने भांडवलशाही उद्दिष्टांनी नगदी पिके काढण्यावर भर देण्यात आला, असे न मानता इंग्रज सरकारने व व्यापाऱ्यांनी भारतीय शेतकऱ्यांवर नगदी पिके काढण्याची जबरदस्ती केली.

ब्रिटीशपूर्व काळात भारतीय शेतकरी आपली व आपल्या गावाची गरज लक्षात घेवून पारंपारिक पिके घेत होती. त्यात नफा हा उद्देश नसून केवळ लहान बाजारपेठेसाठीच उत्पादन केले जात असे. पण ब्रिटीशांच्या अंमलाखाली मोठ्याा प्रमाणावर शेतीचे व्यापारीकरण घडून आले. या बदलत्या परिस्थितीत शेतकऱ्यांना जमीन महसूलाचा रोख व वेळेवर भरणा करण्यासाठी आणि सावकाराचे व्याज व कर्जफेडीसाठी तसेच बाजारपेठेतून माल खरेदी करण्यासाठी इतकेच नव्हे तर विक्रीसाठी ब्रिटीशांनी जाणीवपूर्वक भारतीय हस्तोद्योगावर आघात केला. परिणामी यातून हस्तोद्योगांचा ऱ्हास झाला व खेड्याांची स्वयंपूर्णता नष्ट झाली. याचा सर्वात जास्त परिणाम शेतकऱ्यांवर झाला. यात शेतकरी पूर्णपणे उध्वस्त झाला होता. शेतकऱ्यांची जमीन ही आता विक्रीयोग्य वस्तू बनली होती. यातून अधिकाधिक शेतकरी दरिद्री व भूमीहिन झाले.

- **भारतात पडलेले दुष्काळ व शेतकऱ्यांची स्थिती :-**

भारतीय शेती ही पावसावर अवलंबून आहे. जेथे सर्वसाधारणपणे पाऊस चांगला झाला असतांनाही शेतकऱ्यांजवळ वर्षभर पूरेल एवढेसुध्दा उत्पादन राहत नव्हते. तो कित्येक दिवस अर्धपोटीच जगत होता. जर अवर्षण पडून दुष्काळ पडला तर त्यांच्या संकटास पारावारच राहत नसे. अन्नाविना तडफडून मरण्याशिवाय अन्य कोणताही मार्ग त्यांच्या जवळ नव्हता. अशी स्थिती दुष्काळी परिस्थितीत शेतकरी व भूमीहिन मजुराची होती.

१९ व्या शतकात भारतात कोठे ना कोठे दुष्काळ पडतच असे. १८५८ नंतर सर्वात मोठा दुष्काळ इ.स. १८६०-६१ साली पडला होता. हा दुष्काळ उत्तर प्रदेशात पडला असून यात २ लाखापेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला. विशेषतः आग्रा, अलवार या प्रदेशात दुष्काळामुळे ५ लाख माणसे विस्थापित झाली होती. हे सर्व लोक अन्नपाण्यासाठी भटकत होती. इ.स. १८६५-६६ साली ओरिसा, बंगाल, बिहार व मद्रास या प्रदेशात २० लाख माणसे दुष्काळात बळी पडली होती. यापैकी केवळ ओरिसा प्रांतात १० लाख माणसे मृत्यूमुखी पडली.

यानंतर इ.स. १८६८-७० मध्ये भारतात तीव्र स्वरूपाचा दुष्काळ पडला. या दुष्काळात उत्तर प्रदेश, पंजाब, मुंबई, राजस्थान इत्यादी प्रदेशातील १४ लाख लोकांनी आपले प्राण गमाविले होते. इ.स. १८७६-७८ साली मुंबई, म्हैसूर, मद्रास, हैद्राबाद, उत्तर प्रदेश व पंजाब इत्यादीसह अनेक प्रांतात भयानक दुष्काळ पडला होता. या दुष्काळात महाराष्ट्रात ८ लाख लोक मृत्यूमुखी पडले तर उत्तर प्रदेशात १२ लाख आणि मद्रास प्रांतात ३५ लाख लोकांचा मृत्यू झाला. इ.स. १८९६-९७ मध्ये दुष्काळाने तर कहरच केला. वायव्य प्रांत, उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, मद्रास, मुंबई, पंजाब या प्रांतासह अनेक प्रांतातील ९.५ कोटी लोक या दुष्काळात होरपळल्या गेलीत. यातील ४५ लाख लोकांना अन्नपाण्यावाचून तडफडून मरावे लागले. तर इ.स. १८९९-१९०० या वर्षीच्या दुष्काळात २५ लाख माणसांचा मृत्यू झाला.

लिली नावाच्या युरोपिय लेखकाने प्दकपं ंदक प्जे च्तवइसमउ या पुस्तकात सरकारी माहितीच्या आधारावर पुढील आकडेवारी दिली आहे.

| वर्ष | दुष्काळात मृत्युमूखींची संख्या |
|---|---|
| इ.स. १८०० ते इ.स. १८२५ | १० लाख |
| इ.स. १८२६ ते इ.स. १८५० | ४ लाख |
| इ.स. १८५१ ते इ.स. १८७५ | ५० लाख |
| इ.स. १८७६ ते इ.स. १९०० | २ कोटी ६० लाख |

या दुष्काळात भारतीय ग्रामीण जीवनात हाहाकार माजला होता. या दुष्काळामुळे कंपनी सरकार व ब्रिटीश सरकार हादरून गेले होते. इंग्रज सरकारने १९ व्या शतकात या दुष्काळांना तोंड देण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या. त्यासाठी आयोगााची स्थापना केली. त्या आयोगाने दुष्काळ पिडीतांसाठी मदत करण्याच्या योजना अंमलात आणल्या होत्या. तरीही लाखो लोक मृत्युमूखी पडत होते. यावरून इंग्रज सरकारचे प्रयत्न किती वरवरचे होते हे स्पष्ट दिसून येते.

ब्रिटीश राजवटीत सर्वात जास्त हालअपेष्टा शेतकरी वर्गांना भोगाव्या लागल्या. ब्रिटीश सरकारच्या वाढीव जमीन महसूल, शेतीचे व्यापारीकरण आणि दुष्काळ यांच्या कैचीत सापडलेल्या शेतकऱ्यांना मृत्यूशिवाय दुसरा कोणताच मार्ग नव्हता. अशावेळी अनेक प्रांतातील शेतकऱ्यांनी जुलमी सावकार, सरकारी अधिकारी आणि इंग्रज सरकारच्या विरोधात उठाव केल्याचे दिसून येते.

- **कोलांमधील असंतोष (१८३१) :-**

छोटा नागपूर परिसरात कोल जमातीचे वास्तव्य होते. त्यांचा पुढारी मुंडा नावाचा व्यक्ती होता. ब्रिटीशांनी कोल जमातीची जमीन मुंडापासून हिसकावून ती मुसलमान शेतकऱ्यांना व शिखांना दिली. त्यामुळे कोल शेतकऱ्यांत प्रचंड संताप निर्माण झाला. या संतापाच्या वणव्यात जवळजवळ १००० परकिय व बाहेरील लोकांना ठार केल्या गेले. त्यांना जीवंत जाळण्यात आले. १८३१ मधील हे कोलांचे बंड रांची, सिंहभूम, हजारी बाग, पलामऊ व मानभूमीच्या पश्चिम भागापर्यंत पसरले होते. या बंडाने उग्र स्वरूप धारण केले होते. हे बंड थांबविण्यासाठी इंग्रजांना कोलांशी दिर्घ संघर्ष करावा लागला होता. इंग्रजांनी दिर्घ संघर्षानंतर शेतकऱ्यांचा उठाव दडपून टाकला असला तरी त्यांच्यातील असंतोषाची ज्वाला ते थांबवू शकले नाही. पुढील काळात ब्रिटीशांना त्यांचा सामना करावा लागला.

- **संथाळांचा उठाव (१८५५-१८५६):-**

संथाळ ही वन्य जमात होती. ही उत्तर भारतातील बिहार प्रांतातील भागलपूर प्रदेशात डोंगराळ भागात वास्तव्य करणारी वन्य जमात होय. संपूर्ण देशात वन्य जमातीवर अन्याय, अत्याचार केले जात होते. ही वन्य जमात यातून सुटली नाही. ब्रिटीश राजवटीत त्यांच्यावर अमानुष अत्याचार झालेत. ही जमात शांतीप्रिय, विनम्र असून अनेक काळापासून त्यांचा शेती हाच व्यवसाय होता. १७६३ च्या कायमधारा जमीन महसूल व्यवस्थेपासून त्यांची जमीन जमीनदारांच्या ताब्यात गेली. जमीनदारांनी प्रचंड कर आकारल्यामुळे ते डोंगराळ प्रदेशात निघून गेले. तेथेही त्यांनी अपार परिश्रमाने उपजाऊ शेती केली. ही शेतीसुध्दा जमीनदारांच्या नजरेतून सुटली नाही. इतकेच नव्हे तर सावकारांनीसुध्दा या भागात सावकारी प्रथा सुरू केली. यातून ही जमात कर्जापोटी सावकाराच्या पाशात अडकले गेले. तत्कालीन प्रशासनाने या जमातीची बाजू न घेता सावकारांची बाजू घेवून संथाळाच्या जखमेवर मिठ चोळले. परिणामी संपूर्ण संथाळ जमात पेटून उठली.

संथाळांचा उठाव सिध्दू व कान्हू यांनी घडवून आणला. हे दोन्ही संथाळांचे पुढारी होते. या जमातींनी त्यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र संथाल राज्याची घोषणा केली. या उठावात त्यांनी सरकारची यंत्रणा उध्वस्त करण्याचा प्रयत्न केला. यात त्यांनी तारायंत्रणा, रेल्वेमार्ग, सरकारी कचेऱ्या इत्यादींचा समावेश होता. परिणामी इंग्रज सरकारने लष्करी कारवाई केली. अनेक लष्करी तुकड्याा संथाळाच्या प्रदेशात घुसविल्या आणि त्यांची गावेच्या गावे उध्वस्त केली. १५ हजारापेक्षा अधिक स्त्री-पुरूषांना ठार केले. संथाळाचा नेता सिध्दू याला ब्रिटीशांनी विश्वासघाताने पकडले व त्याला ठार केले. तर कान्हू यालाही इंग्रजानी मारले. तरीही संथाळांनी कडवा प्रतिकार केला. त्यांनी अतिशय निधडे शौर्य दाखविले. तर वैयक्तिक पातळीवरही संथाळांनी इंग्रज लष्करी अधिकाऱ्यांचा तीव्र प्रतिकार केला.

अशारीतीने सामुहिक व वैयक्तिक शौर्यात संथाळ कोठे कमी पडले नाही. पण इंग्रज सामर्थ्यासमोर त्यांचा टिकाव लागला नाही. यातुन एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की, संघटीत शक्तीसमोर कोणाचाही अधिकाधिक काळ टिकाव लागत नाही. संथाळांनी आपल्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचारा विरूध्द केलेल्या उठावामुळे पुढील काळात भारतीय राष्ट्रीय चळवळीची दिशा निश्चित झाली असे दिसून येते.

- **निळ उत्पादक शेतकऱ्यांचा उठावा (१८५९-१८६०) :-**

१८५९-१८६० मध्ये बंगाल प्रांतात निळीचा उठाव घडून आला. बंगालमध्ये युरोपियन मळेवाले निळ उत्पादक शेतकऱ्यांवर जुलूम करीत असत. येथील जमीन युरोपियन लोकांनी द्रव्याच्या बळावर

मिळविली आणि तेच तेथील जमीनदार बनले, आणि तेथील शेतकरी त्यांची कुळे बनून तेथे राहत होते. तेथील जमिनीवर कोणतेही इतर पिके न घेता निळीचे पीक घेण्यासाठी मळेवाले कुळांवर जबरदस्ती करीत. प्रसंगी त्यांच्या सक्ती व अत्याचार करीत. ते शेतकऱ्यांशी खोटे करार करून त्यांची फसवणूक करीत होते.

वास्तविक पाहता या प्रदेशात भातासारखे पीक चांगल्या प्रकारचे येत असे. ते शेतकऱ्यांना फायदेशीर होते. पण निळीचे उत्पादन सक्तीने घ्यावे लागत. अशाप्रकारे अजब मोगलाई युरोपियन व्यापाऱ्यांनी चालविली होती. पण अखेर शेतकऱ्यांनी त्यांच्यावरील अन्यायाविरूध्द आवाज उठविला. हेमचंद्रकार, दिगंबर विश्वास, विष्णू विश्वास यांनी या उठावात महत्वाची भूमिका बजावली. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी शांततामय मार्गाने निदर्शने केली आणि आपल्या जमिनीत निळीचे पीक न घेण्याचा निर्धार व्यक्त केला. मळेवाल्यांनी या शेतकऱ्यांवर भाडोत्री गुंडे पाठविले. पण शेतकऱ्यांनी आपल्या जवळील लाठ्यांनी व भाल्यांनी त्यांचा प्रतिकार केला. हे आंदोलन सर्वत्र पसरले होते. १८६० च्या सुमारास अनेक ठिकाणी त्याचा उद्रेक झाला. यावेळी शेतकरी आंदोलनात गावच्या गावे सामील होवू लागली होती. तेव्हा सरकारने निळीच्या उठावाचा प्रभाव लक्षात घेवून १८६० साली आदेश काढला. त्याव्दारे रयतेवर निळ लागवडीची सक्ती करता येणार नाही, सर्व तंटे कायदेशीर मार्गाने सोडविले जातील, हे जाहीर केले.

अशारीतीने शेतकऱ्यांच्या संघटीत आंदोलनाला यश मिळाले होते. येथे एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की, जर अन्यया विरोधात संघटीतरितीने प्रतिकार केल्यास प्रस्थापित शक्तीला त्यासमोर झुकावेच लागते.

- **दक्षिण भारतातील उठाव (१८७५) :-**

दक्षिण भारतात झालेले विद्रोह प्रामुख्याने मारवाडी, गुजराती सावकारांच्या विरोधात झाले होते. तेथील शेतकऱ्यांवर जास्तीचा भूमीकर व उत्पादनाला अत्यंत कमी भाव दिला जात होता. त्यामुळे येथील शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबला गेला होता. येथील सावकारांनी शेतकऱ्यांची लुबाडणूक करून त्यांना लुटले होते. एवढेच नव्हे तर न्यायालयाने सुध्दा सावकारांच्या बाजूने निकाल दिला होता.

या उठावाचे महत्वाचे कारण म्हणजे मारवाडी सावकार कल्लुराम याने सिरूर तालुक्यातील बाबासाहेब देशमुखांच्या विरूध्द १५० ऋणाच्या बदली त्याच्या विरूध्द कृषीवरून बेदखलीचे आज्ञापत्र मिळविले. परिणामी सावकारांनी बाबासाहेबांच्या घराला घेरले. तेव्हा शेतकऱ्यांनी सावकारांविरूध्द उठाव केला. पूना जिल्ह्यापर्यंत हा उठाव पसरला होता. ज्या ज्या सावकारांनी शेतकऱ्यांच्या जमिनीचे गहाण खत तयार केले होते. ते दस्ताऐवज शेतकऱ्यांनी जाळून नष्ट केले. अहमदनगर जिल्ह्यात सुध्दा असाच प्रकार घडला होता. शेवटी कंपनी सरकारने लष्कराच्या मदतीने उठाव दडपून टाकला. या उठावाचे महत्वाचे यश म्हणजे विद्रोही लोकांविरूध्द लष्करी पुरावे मिळाले नाही. तेव्हा सरकारने कृषक राहत अधिनियम पारीत केला. या नियमानुसार शेतकऱ्यांना तुरूंगामध्ये टाकणे किंवा बंदिस्त केल्या जावू शकत नव्हते.

- **चंपारण्य व खेडा सत्याग्रह :-**

उत्तर बिहार मधील चंपारण्य जिल्ह्यातील युरोपियन निळ उत्पादक शेतकऱ्यांचे शोषण करीत असे. असाच प्रकार बंगाल प्रांतात सुरू होता. याची माहिती महात्मा गांधीजींना मिळाली. तेव्हा गांधीजींनी डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या सहाय्याने शेतकऱ्यांची स्थिती जाणून घेतली. तेव्हा गांधीजींनी येथील शेतकऱ्यांना संघटीत अहिंसात्मक मार्गाने आंदोलन करण्याची प्रेरणा दिली. तेव्हा सरकारने चंपारण्य शेतकरी अधिनियम पारीत केला व शेतकऱ्यांना न्याय मिळाला. शेतकऱ्यांच्या बऱ्याच मागण्या मान्य कराव्या लागल्या.

१९१८ मध्ये गुजरातमधील खेडा जिल्ह्यात दुष्काळ पडला. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला होता. अशाही स्थितीत कंपनीचे अधिकारी सक्तीने कराची वसूली करीत होते. तेव्हा गांधीजींनी खेडा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना संघटीत केले. त्यांनी १९१९ मध्ये साराबंदी चळवळ घडवून आणली. या सत्याग्रहात वल्लभभाई पटेल, इंदूलाल पारिख, ना.म.जोशी इत्यादी नेते सामील झाले होते. सरकारच्या

दडपशाहीला शेतकरी नमले नाहीत. शेवटी इंग्रज सरकारला नमते घ्यावे लागले. त्यांच्या मागण्या सरकारने मान्य केल्या. सरकारने येथील शेतकऱ्यांचा सारा माफ केला.

अशाप्रकारे १९४७ पूर्वी कंपनी सरकारच्या काळात आणि ब्रिटीश सरकारच्या काळत जे शेतकऱ्यांचे आंदोलने झाले. त्या सर्वच आंदोलनात शेतकऱ्यांना कमी यश मिळाले असले तरी तत्कालीन प्रशासन व्यवस्थेला त्यांनी जोरदार हादरून सोडले होते, प्रसंगी त्यांना आंदोलनासमोर गुडघे टेकावे लागले होते. या सर्व शेतकरी आंदोलनाचा उद्देश सरकार, जमीनदार व सावकार हाच होता. पण कृषीव्यवस्थेत व शेतकऱ्यांच्या स्थितीत मुलभूत स्वरूपाचे बदल व्हावेत यासाठी वातावरण निर्मिती करणे हा शेतकऱ्यांच्या उठावाचा दूरगामी हेतू होता असे स्पष्ट होते.

● **निष्कर्ष :-**

या स्वातंत्र्यलढ्यापूर्वी शेतकऱ्यांनी संघटीत होवून प्रस्थापित सत्तेला आव्हान दिले होते. तेव्हाच त्यांना न्याय मिळाला होता. भारतातील विविध प्रांतातील शेतकऱ्यांनी आपल्या अन्याय, अत्याचाराच्या विरोधात संघटीतपणे यशस्वी लढा दिला. पण स्वातंत्र्यानंतर भारतीय शेतकऱ्यांचे चित्रच बदललेले दिसून येते. आपलेच शेतकरी, आपलीच शेती आणि आपलेच सरकार अशी स्थिती असतानांही भारतीय शेतकरी देशात व महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात आत्महत्या करतांना दिसतो आहे. शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळत नाही. शिवाय अनेक ठिकाणी सिंचनाची व्यवस्था नसल्यामुळे शेतकऱ्यांना वरूण राजावर अवलंबून राहावे लागते. तोसुध्दा राजकीय पुढाऱ्याप्रमाणेच शेतकऱ्यांना दगा देत आहे. यात शेतकऱ्यांना बॅंका, खाजगी सावकारांकडे हात पसरावे लागत आहे. यात बहुसंख्य शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत बिकट झाली आहे. यातून त्यांनी आत्महत्यासारखे मार्ग स्विकारले आहे. पण शेतकऱ्यांना असे आवाहन आहे; की त्यांनी आत्महत्या करण्यापेक्षा तुम्ही संघटीतपणे अन्यायाविरोधात व सरकार विरोधात लढा उभारा व तुमच्या मागण्या त्यांच्यासमोर मांडा. सिंचनासाठी शेतकऱ्यांनी सरकारी योजनांचा पूर्णपणे लाभ घ्यावा. बाजारपेठेला अनुसरून आपल्या शेतीतून उत्पादन घेतले पाहिजे. शेतीत रासायनिक खते व किटकनाशकांचा शक्यतो वापर कमी करण्याचा प्रयत्न करावा. सेंद्रीय शेतीकडे शेतकऱ्यांनी वळले पाहिजे. आज देशात पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. अशा स्थितीत शेतीला पाणी कोठून मिळणार? यासाठी शेतकऱ्यांनी संघटीत होवून पावसाचे पाणी अडवून ते जमितीनीत कसे साठवून ठेवता येईल याची दक्षता घ्यावी. यासाठी शेतकऱ्यांनी जलतज्ञांच्या सल्ल्यानूसार पाण्याचे नियोजन करावेत. जेणेकरून शेतीतून वर्षाकाठी २ ते ३ पिके घेता येईल. आज बाजारात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांची फसवणूक केली जाते. यासाठी शेतकऱ्यांनी बोगस बियाणे विकत न घेता, शक्य असल्यास आपल्याच घरी किंवा गावात बियाणांची व्यवस्था करावीत. जेणे करून ते बियाणे खात्रीचे राहील व त्याच्यात उगवण क्षमता निश्चितच चांगली राहील. शेतकऱ्यांनी शेतीला पूरक व्यवसाय केल्यास त्यांची आर्थिक स्थिती मजबूत होईल. पर्यायाने शेतीवरचा भार कमी करता येईल.

शेतकऱ्यांनी आपले उत्पादन दलालांच्या हाती न देता स्वतः त्या उत्पादनांची विक्री कशी करता येईल याची व्यवस्था करावी. त्यामुळे शेती उत्पादनाला चांगला भाव मिळेल. शेती सिंचनाच्या विविध योजना सरकार राबवित आहे. त्या योजना शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष घेवून त्यावरच खर्च केल्यास त्याचा भविष्यासाठी उपयोग होईल. एंकदरीत बाजारपेठा, व्यापारी व सरकार यांनी शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळेल अशी व्यवस्था करावी. जेणेकरून शेतमालाला चांगली किंमत मिळाल्यास शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावल्या जाईल. पर्यायाने शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविता येईल. यात दुमत नाही.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. **डॉ. जयसिंहराव पवार, – भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास,** निराली प्रकाशन, पुणे–२०१३
२. **बी.एल.ग्रोवर, – आधुनिक भारताचा इतिहास,** एस.चंद आणि कंपनी लि. नवी दिल्ली– २००३

३. **यशवतंराव चव्हाण - आधुनिक भारताचा इतिहास,** His.२२० - डॉ. निलेश भोंडे, **महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,** कुलसचिव,यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक- २००१
४. **विपीन चंद्र - आधुनिक भारत का इतिहास,** ओरियंट ब्लैकस्वान प्रा.लि., न्यू दिल्ली-२०१२
५. **आचार्य शं.द. जावडेकर - आधुनिक भारत,** कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे-२००१